# चंद्रपूर कोविड-19 पेशंट मॅनेजमेंट पोर्टल एक जिल्हा.. एक यादी..

या पोर्टल च्या माध्यमातून जिल्ह्यामधील कोविड रुग्णांना चंद्रपूर शहरातील सर्व कोवीड रुग्णालयात आय.सी.यु., व्हेंटिलेटर व ऑक्सिजन बेड च्या तीन स्वतंत्र प्रतीक्षा यादी नुसार बेड उपलब्ध होतील.

रुग्णाची अवस्था गंभीर असल्यास रुग्ण थेट रुग्णालयांमध्ये जाऊन भरती होऊ शकतील. संबंधित रूग्णालय आवश्यक ती नोंदणी रुग्णाला भरती करून घेतल्यानंतर यथावकाश करेल.

प्रणलीवर वैद्यकीय तपासणीची वसतुनिष्ठ माहिती भरावयाची असल्याने रूग्णांना वैयक्तिक नोंदणी करता येणार नाही. सर्वप्रथम रुग्ण जवळच्या कोवीड केअर सेंटर किंवा कोविड रुग्णालयात गेल्यावर तिथे रुग्णांचे ऑक्सिजन लेवल व इतर बाबींची तपासणी करून त्याची नोंदणी सदर पोर्टलवर अपलोड करण्यात येईल.

नोंदणी करताना रुग्णाचा आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक, रुग्णाच्या शरीरातील ऑक्सीजन पातळी, आरटीपिसीआर तपासणी अहवाल आवश्यक आहे. तसेच नोंदणी करताना चार रुग्णांच्या नोंदणीसाठी एका मोबाइल क्रमांकाचा वापर करता येऊ शकेल, बेड उपलब्धतेची माहिती मोबाइलवर देण्यात येणार असल्याने नोंदणीच्या वेळी योग्य मोबाईल क्रमांक नोंदवावा. नोंदणी करतांना मोबाईल क्रमांक केवळ अनुषंगीक संपर्कासाठी आवश्यक करण्यात आला असून आधार क्रमांक युनिक आयडी असल्याने रूग्णाची ओळख पटविण्यासाठी नोंदवायचा आहे, त्यामुळे पोर्टलवर नोंदणीसाठी आधार लिंक असलेल्या मोबाईलची काहीही गरज नाही. तसेच बेड उपलब्धतेसाठी कोणत्याही ओटीपी ची गरज पडत नाही.

नोंदणीनंतर प्रत्येक रुग्णांना एक टोकन नंबर देण्यात येईल. सदर पोर्टलवर नोंदणी केलेल्या रुग्णांची बेड निहाय प्रतीक्षा यादी तयार होईल.

रुग्णाची गंभीर स्थिती पाहून केंद्रीय प्रवेश पद्धतीनुसार रुग्णाला चंद्रपूर शहरातील आवश्यक सुविधा युक्त हॉस्पिटलमध्ये बेड उपलब्ध होईल व त्यांच्यावर वेळीच उपचार सुरू होईल.

रुग्णांना प्रतिक्षा यादीतील आपले स्थान कंट्रोल रूमच्या 07172-274161 व 07172-274162 या क्रमांकावरून माहिती करून घेता येईल.

अधिक माहिती साठी Click Here or Click Here